महाराष्ट्र शासन
पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली
Padmabhushan Vasantdada Patil Government Hospital, Sangli
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज या संस्थेशी संलग्न शैक्षणिक रुग्णालय
2374651 to 2374654(PBX) Fax No.: 0233/2374585 Email: pvpghsangli@yahoo.co.in

जा.क्र.पवपाशारुसां/आस्था-२/भौवेशास्त्र/रिक्त् पद/जाहिरात/२७१३-२९/२०२३, दि.१४/०३/२०२३

# जाहिरात (सन २०२३)

## सेवानिवृत्त भौतिकशास्त्रवेत्ता वर्ग-२ यांची करार पध्दतीने नामिकासूची (Panel) तयार करणे.....

---

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ नुसार मा.आयुक्त्,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज संलग्न पद्मभूषण वसंतदादा पाटील,शासकीय रुग्णालय सांगली या संस्थेच्या आस्थापनेवर निव्वळ तात्पुरत्या तत्वावर करार पध्दतीने १ वर्षासाठी अथवा नियमित तत्वावर उपलब्ध होईपर्यंत **"<u>भौतिकशास्त्रवेत्ता गट-ब</u>"** या पदासाठी शासकीय कार्यालये/शासकीय उपक्रम/संविधिक संस्था/मंडळे/महामंडळे स्थानिक स्वराज्य संस्था मधील सेवानिवृत्त अधिका-यांमधून करार पध्दतीने नामिकासूची (Panel) करण्यासाठी विहीत केलेल्या यासोबतच्या नमुना प्रमाणे आवेदन अर्ज या संस्थेच्या www.gmcmiraj.edu.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर आवेदन अर्ज सादर करण्याची **अंतिम मुदत दिनांक २३.०३.२०२३ अशी राहिल.** प्राप्त अर्जामधून पात्र सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची निवड करून १ वर्षासाठी नामिकासूची (Panel) तयार करण्यात येईल व त्यानुसार नेमणूका करण्यात येईल.

आवेदन अर्ज खालील पत्यावर फक्त स्पीडपोस्ट किंवा रजिस्टर पोस्टाव्दारे स्विकारले जातील तसेच विहित कालावधीत न आलेले अर्ज व पूर्ण न भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

पत्ता : अधिष्ठाता, पद्मभूषण वसंतदादा पाटील,शासकीय रुग्णालय सांगली,डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, सिव्हिल हॉस्पीटल चौक, सांगली- ४१६ ४१६.

| अ.क्र. | पदनाम | दर्जा | अर्हता व अनुभव | पद संख्या व नियुक्तीचे ठिकाण | मासिक पारिश्रमिक व भत्ते |
|---|---|---|---|---|---|
| १ | भौतिकशास्त्रवेत्ता | गट-ब | महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील सेवानिवृत्त भौतिकशास्त्रवेत्ता, गट-ब | पद-०१<br>ठिकाण-पद्मभूषण वसंतदादा पाटील,शासकीय रुग्णालय सांगली | १) नियुक्तीच्या वेळी महागाई भत्तासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाऐवढी रक्कम (अंशराशकृत निवृत्तीवेतन वगळून) यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चिती करण्यात येईल आणि एकादा निश्चिती करण्यात आलेले पारिश्रामिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील.<br>२) ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पदध्तीने नियुक्त करताना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करून त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात येईल.<br>**<u>भत्ते:-</u>** उक्त तरतूदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता' या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात येईल. |

**विहित नमुन्यातील संपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक त्या संबंधीत प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह सादर करणे आवश्यक आहे.**

**इतर अटी व शर्ती :-**

१) अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टिने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) उमेदवारानी स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदाच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

३) पत्र व्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

४) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्यच्या दृष्टीने सक्षम असावा,तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

६) निवड झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना या रुग्णालयातील किरणोपचारशास्त्र विभागामध्ये निव्वळ तात्पुरत्या तत्वावर १ वर्षे मुदतीसाठी अथवा नियमित तत्वावर उपलब्ध होईपर्यंत करार पध्दतीने नेमणूका करण्यात येतील व या कालावधीत वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मासिक पारिश्रमिक व भत्ते अनुज्ञेय राहतील..

७) निवड झालेल्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

८) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

९) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अलीकडील फोटो व मान्यता प्राप्त फोटो ओळखपत्र, तसेच शैक्षणिक पात्रता, राखीव प्रवर्गासाठी आवश्यक असलेले सर्व प्रमाणपत्र व अनुभवा संदर्भात आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या सांक्षाकित प्रती नेमणूकीच्या वेळी सोबत आणाव्यात.

१०) निवड झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे पत्र नेमणूकीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

११) सेवानिवृत्त अधिका-या विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू अगर प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१२) नियुक्तीनंतर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना निवासस्थान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या कार्यालयाची असणार नाही.

१३) सेवानिवृत्त अधिकारी यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१४) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१५) सेवानिवृत्त अधिका-यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

१६) करार पद्धती वरील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१७) सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामाकाजाबाबत सक्षम प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१८) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

१९) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येणार नाही.

<u>महत्वाच्या विशेष सूचना :-</u>

१. सदर करार पध्दतीचा कालावधी नियुक्तीपासून फक्त १ वर्षाचा राहील व कालावधीनंतर त्यांची आपोआप सेवा संपुष्टात येईल.

२. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची राहील तसेच विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा व नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, या आशयाचे बंधपत्र देणे आवश्यक राहील.

३. निवड झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी १००/- रूपयांच्या बॉंड पेपरवर नोटराइज्ड प्रतिज्ञापत्र / बंधपत्र द्यावे लागेल.

४. या रुग्णालयाच्या कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी

५. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर बाबविण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली यांना राहतील.

६. निवड झालेला सेवानिवृत्त शासकीय अधिकारी जर ७ दिवसांत नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्यास स्वारस्य नाही, असे समजून कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

वरील नमुद केलेल्या भौतिकशास्त्रवेत्ता वर्ग-२ या पदासाठी अर्ज दिनांक. २३/०३/२०२३ पर्यत सादर करावीत . मुलखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठवले जाणार यांची नोंद घ्यावी. तसेच सदरची प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली, यांनी राखून ठेवले आहेत.

दिनांक :- :१४.०३.२०२३
स्थळ :- सांगली.

अधिष्ठाता
पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली.

प्रति,

१) वैद्यकीय अधिक्षक, प.व.पा.शा.रु.सांगली/शावैमरु मिरज.
२) प्राध्यापक व विभाग प्रमुख रेडीओथेरेपी विभाग,प.व.पा.शा.रु.सांगली.
३) सुचना फलक, विद्यार्थी वसतिगृह, बाह्यरुग्ण विभाग,सांगली-मिरज/अधिष्ठाता दालन नोटीस बोर्ड/ ग्रंथालय,शावैम मिरज/शावैमवरुमि/पवपाशारुसांगली.
४) आय.एच.आर.नोटीस बोर्ड,प.व.पा.शा.रु.सांगली.

प्रत माहितीसाठी अग्रेषित-

१) अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज.
२) अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रुग्णालय संकूल, ९ वा मजला, मुंबई.
२) मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-४०० ००१.
३) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-४०० ००१.

# अर्जाचा नमुना

प्रति,
मा.अधिष्ठाता,
पद्मभूषण वसंतदादा पाटील,
शासकीय रुग्णालय सांगली ४१६४१६.

स्वसाक्षांकीत केलेला
अलीकडच्या काळातील
Passport Size Colour
Photo

**विषय:- भौतिकशास्त्रवेत्ता वर्ग-२ या पदासाठी बाबत...**

संदर्भ:-

मा.महोदय,

वरील संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मी विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो/करते की, मी शासन निर्णय दि. १७.१२.२०१६ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असून वरील विषयात नमूद केलेल्या पदाचे काम करण्यास इच्छूक असून मी खाली नमूद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त अधिकारी यांचे पूर्ण नांव व प्रवर्ग | |
| २ | पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता/संपर्क दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक / Email ID आणि संबंधित हद्दीतील पोलीस ठाणे | |
| ३ | सेवानिवृत्तीवेळी धारण केलेल पद व विभाग | |
| ४ | शासकिय सेवेत प्रवेश केल्याचा दिनांक / शासकिय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्ती पर्यंत धारण केलेली पदे व कार्यालय | |
| ५ | सेवानिवृत्तीचा दिनांक (कार्यालयीन आदेशाची छायांकित प्रत यासोबत सादर केली आहे.) | |
| ६ | अर्जाच्या दिनांकास पूर्ण वय | |
| ७ | सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र) | |
| ८ | अर्जदार सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र. | |
| ९ | विवक्षित कामाच्या अनुषंगाने प्रवास करावा लागत असल्यास तसे हमी पत्र सोबत जोडणे आवश्यक | |
| १० | सदयस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन (संबंधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह). | |
| ११ | अर्ज केलेल्या पदासाठी अनुभव कालावधी आणि काम केलेल्या विभागाचे/ कार्यालयाचे नाव व ठिकाण. | |

स्थळ :-

दिनांक:- (सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे नाव व दिनांकित स्वाक्षरी)